# नमो महारोजगार मेळाव्यात’ अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे : उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर

**बारामती / प्रतिनिधी**

बारामती येथे आयोजित पुणे विभागस्तरीय ‘नमो महारोजगार मेळाव्यात’ अधिकाधिक विद्यार्थ्यांची नोंदणी करुन त्यांना या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय येथील सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी नायब तहसीलदार तुषार गुंजवटे, आगार प्रमुख वृषाली तांबे, सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य, प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. नावडकर म्हणाले, २ व ३ मार्च रोजी आयोजित नमो महारोजगार मेळाव्यात विभागातील विविध आस्थापना सहभागी होणार असून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मेळाव्याच्या ठिकाणी करियर विषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या संधीचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यासाठी संकेतस्थळाची माहिती देण्यात यावी. नोंदणी करण्याविषयी मार्गदर्शन करावे. त्यांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करावे. मेळाव्यात रिक्त जागेबाबत माहिती देण्यात यावी.

विद्यार्थ्यांना मेळाव्याच्या ठिकाणी ने-आण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि संबंधित संस्थांनी समन्वयाने कार्यवाही करावी. संस्थेच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने बस उपलब्ध करुन देण्यात याव्यात. मेळाव्याच्या अनुषंगाने संस्थेला येणाऱ्या समस्या निराकरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

परिसरातील अधिकाधिक युवक-युवतींनी मेळाव्यासाठी नावनोंदणी करून रोजगार संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी श्री. नावडकर यांनी केले.

या रोजगार मेळाव्यात अधिकाधिक युवकांची नोंदणी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे उपस्थित प्राचार्यांनी सांगितले.

# मा. खासदार शिवाजीराव आढळराव पाटील अजित पवार गटात जाणार असल्याची चर्चा

## शिरूर लोकसभेच्या उमेदवारीसाठी निर्णय घेण्याची शक्यता

**प्रतिनिधि - निरगुडसर**

शिरूर लोकसभा मतदारसंघाचे मा. खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिनांक २९ फेब्रुवारी रोजी शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी, पक्ष अंगीकृत संघटना व सर्व शिवसैनिकांची अती तातडीची बैठक बोलावली असून या बैठकीत ते महत्त्वाची घोषणा व निर्णय घेणार असल्याची चर्चा होत आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवाराबाबत उमेदवारी बाबत ते ठाम भूमिका घेणार असल्याचे बोलले जात आहे. लोकसभा निवडणुकीचे पार्श्वभूमीवर शिरूर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून डॉ. अमोल कोल्हे हे उमेदवार जाहीर करण्यात आले मात्र सत्ताधारी भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्याकडून अद्याप पर्यंत शिरूर लोकसभेचा उमेदवार जाहीर करण्यात आलेला नसल्याने सदर बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघावर अजित पवार यांनी दावा केला असल्याचे बोलले जात असुन उमेदवारी मिळवण्यासाठी मा. खासदार शिवाजीराव आढळराव पाटील कार्यकर्त्यांची चर्चा करून अजित पवार यांच्या गटात जाणार असल्याची चर्चा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटात सुरू आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघात डॉ.अमोल कोल्हे यांच्या विरोधात तगडा उमेदवार देण्याबाबत चाचपणी सुरू असून आमदार महेश लांडगे, मा. आमदार विलास लांडे, प्रदीप कंद यांच्या नावाची चर्चा होती मात्र मा. खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हेच अमोल कोल्हे यांना जड जाऊ शकतात अशी चर्चा मतदारसंघात होत आहे.

## थोडक्यात

### संत रोहिदास महाराजांची जयंती साजरी!

**पाटस :** दौंड तालुक्यातील पाटस येथे संत रोहिदास महाराज यांची जयंती विविध धार्मिक कार्यक्रमांनी नुकतीच साजरी करण्यात आली.

पाटस येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे माजी ग्रामपंचायत सदस्य शंकर पवार यांच्या हस्ते पूजन करुन पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते शशिकांत काकडे, संकेत पानसरे, चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष गोरख सोनवणे, सुहास सोनवणे, प्रमोद आखाडे, प्रणय काकडे आदी उपस्थित होते. तसेच रोहीदास नगर येथे ही संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संत रोहिदास महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रवचन आणि किर्तनाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी महिला आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिवरे कुंभार मधून शेतकऱ्याच्या ट्रॅक्टरची अवजारे चोरी

**शिक्रापूर :** हिवरे कुंभार ता. शिरुर येथील राजेंद्र धुमाळ यांनी शेतीसाठी ट्रॅक्टर घेतलेला असून त्यांच्या ट्रॅक्टरची अवजारे घराच्या शेजारी ठेवलेली असल्याने त्या अवजारांना धुमाळ हे म्हैस बांधत असल्याने नेहमीप्रमाणे धुमाळ हे सकाळच्या सुमारास ट्रॅक्टरच्या अवजारांना म्हैस बांधण्यासाठी गेले असता त्यांना अवजारे नसल्याचे दिसले तर शेजारी पाहणी केली असता अवजारे ठेवलेल्या ठिकाणी कोणत्यातरी मोठ्या वाहनाच्या चाकांचे व्रण दिसून आल्याने अवजारांची चोरी झाल्याचे लक्षात आल्याने राजेंद्र मारुती धुमाळ व ५१ वर्षे रा. हिवरे कुंभार ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने शिक्रापूर पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मंगेश लांडगे हे करत आहे.

### सामाजिक कार्यकर्ते मते यांचा आळंदीत सत्कार

**आळंदी :** खडकवासला येथील सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र सोपानराव मते आणि पुणे येथील कवी व गीतकार जयंत भिडे यांचा पानवेलकर कला व सांस्कृतिक मंडळाचे वतीने त्यांनी केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून स्मृतिचिन्ह देऊन आळंदीत उत्साहात सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी संदीप नाईक, जयंत भिडे , आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त ड. राजेंद्र उमाप, समाजसेवक नरेंद्र मते, गोवा कला व संस्कृती संचालनालय संचालक सगुण वेळीप, असिस्टंट कल्चरल अधिकारी, गोवा कला व संस्कृती संचालनालय सिद्धार्थ गायतोंडे, श्री संत तुकाराम महाराज संस्थान श्री क्षेत्र देहू अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे, देहूकर यांचे उपस्थितीत आणि मान्यवरांचे हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा झाला. खडकवासला, आळंदी परिसरातून या पुरस्काराचे स्वागत करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकीतून होत असलेल्या कार्याचा सन्मान झाल्याचे समाजसेवक मते यांनी सांगितले.

# पुरंदरमधील प्रशासकीय कार्यालये नवीन इमारतीत वर्ग करावीत : आ. संजय जगताप यांची विधीमंडळात मागणी

**सासवड / प्रतिनिधी**

पुरंदरच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये तहसील, उपविभागीय अधिकारी व इतर प्रशासकीय कार्यालय नवीन इमारतीत वर्ग करावीत., दुष्काळी परिस्थितीबाबत शासनाने मदत करावी अशा अनेक महत्त्वाच्या मागण्यांबाबत पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांनी मंगळवारी ( दि २७ ) राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधीमंडळाचे लक्ष वेधले.

याबाबत आमदार संजय जगताप यांनी, १५ ऑगस्ट रोजी पुरंदरच्या नवीन प्रशासकीय इमारत पुर्ण झाली होती व त्यावेळी पुरंदर तहसील व इतर प्रशासकीय कार्यालये नवीन इमारतीत स्थलांतरित करून कामकाज सुरू करण्याबाबत वेळोवेळी पालकमंत्री तसेच महसूलमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी केली होती.

पालकमंत्री आणि महसूल मंत्री यांनी सुचना करूनही गेली ७ महिन्यांपासून याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही. मध्यंतरी येथील ३०० वर्षे जुन्या ऐतिहासिक वास्तूमध्ये असणाऱ्या पुरंदर तहसील कार्यालयातून ईव्हीएम मशीनचा सीपीयू चोरीला गेला व त्यामुळे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक व इतर दोन कर्मचा-यांचे निलंबन करण्यात आले. त्यामुळे नवीन इमारत तयार असतानाही येथे तहसील कार्यालय वर्ग का केली नाहीत असा प्रश्न महसूल मंत्र्यांनी प्रशासनला काका केला नाही असा प्रश्न उपस्थित करीत महसूलमंत्र्यांनी तातडीने नवीन प्रशासकीय इमारतीत प्रशासकीय कार्यालयांचे कामकाज सुरू करण्याबाबत आदेश देण्याची मागणीही आमदार संजय जगताप यांनी केली.

याबरोबरच सर्वसामान्य शेतकरी, ग्रामीण भागातील नागरीकांच्या सोयीसाठी आमदार संजय जगताप यांनी, पानंद रस्ते व इतर रोजगार हमी योजनेच्या कामांसाठी मनुष्यबळ पुरेसे नसल्याने यांत्रिकीकरणाच्या वापराला परवानगी द्यावी अशी मागणी वनमंत्र्यांकडे केली. याबरोबरच पुरंदर तालुक्यातील भिषण दुष्काळी परिस्थिती मांडत यासाठी जनावरांच्या चारा छावण्या, टँकरने पाणी भरण्यासाठी जवळच्या ठिकाणी व्यवस्था करण्यातबाबत तसेच रेशनिंग दुकानावर पशुखाद्याच्या वाटपाची व्यवस्था करण्याची मागणी केली. सध्याच्या तिव्र दुष्काळी थकीत वीजबिलाअभावी शेतकरी वर्गाच्या विद्युत पंपांची विजजोड तोडण्यात येत आहे., याबाबत वीजबील वसुली तात्पुरती बंद करावी जेणेकरून सध्याच्या दुष्काळी परीस्थितीत जनावरांच्या चारा पाण्यासाठी आणि नागरीकांनी वापरासाठी शिल्लक असणाऱ्या पाण्याचा वापर शेतकऱ्यांना करता येईल. अशीही मागणी आमदार संजय जगताप यांनी विधीमंडळात केली.

# एव्हरेस्ट अबॅकस शिरूर शाखेच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

**शिरूर / प्रतिनिधी**

गुरुकृपा लॉन या ठिकाणी एवरेस्ट अबॅकस अकॅडमी आयोजित नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन स्पर्धकांनी भरघोस यश संपादन केले.

सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुणे निवासी नायब तहसीलदार स्नेहा गिरी गोसावी, गंगा एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका कु. अमृतेश्वरी घावटे, समप्रभा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष धनंजय नाईक, विद्याधाम प्रशाला देवदैठण मुख्याध्यापक बाळासाहेब दहिफळे, पत्रकार चेतन पडवळ , शिरूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्यांक विभागाचे राजुद्दीन भाई सय्यद, या सर्व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

शिरूर मध्ये २३ वी राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा पार पडली या स्पर्धेमध्ये शिरूर, पुणे, शिक्रापूर, कर्जत, श्रीगोंदा, टाकळी हाजी, देवदैठण, न्हावरा, नारायणगव्हाण, चास, करंदी यासारख्या वेगवेगळ्या तालुका व गावांमधून ८२३ विद्यार्थी सहभागी झाले होते. या वेळी प्रतिभा पुजारी व सुवर्णा ठोकळ या शिक्षकांना दुसऱ्यांदा स्टार शिक्षक व वैशाली लोंढे यांना स्टार शिक्षक तसेच अजित म्हस्के यांना बेस्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी अबॅकस च्या सर्व लेव्हल पूर्ण करणाऱ्या श्रावणी चौधरी या विद्यार्थिनीला अबॅकस मास्टर ही पदवी बहाल करण्यात आली, तर चॅम्पियन म्हणून सर्वेश कोल्हे, आरोही देसाई, श्लोक खेडकर, ओम बारी, धनश्री अहिरराव, सौम्य हराळ, श्लोक कोरके, वेदिका शेजाळ, आदिराज कोलते, खोले वैष्णवी, साई खेतमाळीस, स्वराज मिडगुल, तन्मय बरशिले, आराध्या गवारे, नीरज शेळके, मनन पिंपरकर, मेघांत वैद्य, आराध्या यादव, शुभेच्छा गायकवाड, श्रावणी चौधरी या स्पर्धकांना घोषित करण्यात आले. परीक्षेत विद्यार्थ्यांनी पाच मिनिटात १६५ बेरीज आणि वजाबाकी, १३७ गुणाकार, १२७ भागाकार, तर



१०८ वर्ग संख्या सोडवल्याने पालक व मान्यवर अवाक झाले.


## जाहीर नोटीस

### ग्रामपंचायत आव्हाळवाडी,ता.हवेली,जि.पुणे

**खुली दरपत्रके मागणी**

ग्रामपंचायत आव्हाळवाडी,ता.हवेली,जि.पुणे खालील तपशीलाप्रमाणे निविदाकाराकडून दरपत्रके दि.२९-०२-२०२४ ते दि.०६-०३-२०२४ पर्यंत सीलबंद लिफाफ्यामधून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी खालील नमूद कामाचे दरपत्रक दि.०६-०३-२०२४ रोजी दु.०४.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावयाची आहेत.दरपत्रके दि.०७-०३-२०२४ रोजी स.१०.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | इसारा रक्कम (रु) | निविदा फी (रु) |
|---|---|---|---|
| १. | PMJAY योजनेच्या जनजागृती साठी भित्ती चित्र काढणे,ता.हवेली | ५००/- | ११२/- |
| २. | अंगणवाडी इमारतीवर भित्ती चित्र काढणे,ता.हवेली | १,०००/- | ११२/- |

- तांत्रिक लिफाफ्या मध्ये द्यावयाची कागदपत्रे-
  १.शॉप ऍक्ट,२.पॅन कार्ड,३.जी.एस. टी प्रमाणपत्र
- आर्थिक लिफाफा मध्ये द्यावयाची कागदपत्रे-
  १.लेटरहेडवर प्रति चौरसफुट प्रमाणे दर स्वसाक्षांकित करून

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रा.पं. आव्हाळवाडी, ता. हवेली जि.पुणे

सही/-
सरपंच
ग्रा.पं. आव्हाळवाडी, ता. हवेली जि.पुणे

## जाहीर निविदा सूचना

सर्व नोंदणीकृत अभियंता व त्या वर्गातील कंत्राटदारांना कळविण्येत येते कि दौंड तालुक्यातील मौजे पेडगाव ग्रामपंचायत अंतर्गत खालील ठिकाणी कामे हाती घेणेत आलेली असून सदरची कामे कारणे कामी नमूद केलेल्या वर्गातील कंत्राटदाराकडून बी १ निविदा मागविनेत येत असून सदर काम करणारे त्या वर्गातील कंत्राटदार यांनी सदरच्या निविदा ग्रामपंचायत पेडगाव ता. दौंड,जिल्हा-पुणे,येथे कार्यालयीन वेळेत दिनांक २९/०२ /२०२४ ते ६/ ०३/२०२४ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयात दोन प्रतीत(तांत्रिक व आर्थिक) बंद लिफाफ्यात सादर कराव्यात सदर निविदा दिनांक ७/ ०३ /२०२४ रोजी सकाळी ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक/सरपंच यांचेसमोर ग्रामपंचायत कार्यालयात उघडनेत येतील कोरे निविदा अर्ज ग्रामपंचायत कार्यालय पेडगाव येथे विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घ्यावे कोरे निविदा अर्ज फी ग्रामपंचायत पेडगाव PDCC बँक शाखा देऊळगाव राजे खाते क्रमांक ०८५००२५००००००४ वर किंवा ग्रामपंचायत मध्ये रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील कोरे अर्ज निविदा फी जमा केलेली पोहच तांत्रिक लिफाफा मध्ये जमा करावी सुरुवातीला तांत्रिक लिफाफा उघडनेत येईल व आपली निविदा सर्व नियमास पात्र झालेनंतर आर्थिक लिफाफा उघडनेत येईल जे ठेकेदार तांत्रिक लिफाफा मध्ये अपात्र होतील त्यांचा आर्थिक लिफाफा उघडनेत येणार नाही

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रकम्म | कोरे अर्ज निविदा फी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | PROVIDING FHTC AT PEDGAON TAL DAUND DIST PUNE | ९२४२८७/- | २३६ /- | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |

आवश्यक कागदपत्रे-
१)नोंदणी प्रमाणपत्र,२)जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र,३)PAN कार्ड,४) कामाच्या अनुभवाचा दाखला,५) मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (ITR)
टीप:-, निविदा संधर्भातील कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे व इतर सर्व अधिकार सरपंच ग्रामसेवक ग्रामपंचायत पेडगाव ता.दौंड,जिल्हा-पुणे.यांनी राखून ठेवले आहेत.

सही/---
ग्रामविकास अधिकारी/सरपंच
ग्रामपंचायत पेडगाव ता.दौंड,जि.पुणे.

## जाहीर नोटीस

सर्वसाधारणपणे जनतेला जाहीर नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, कोटक महिंद्रा बँक लिमिटेडने खाली दिलेल्या वाहनांचा लिलाव आयोजित केला आहे.

**MH12SX9440** टाटा मोटर्स – टेक गोल्ड– **2021** किमान राखीव किंमत : २४००००/–

मेसर्स कोटक सह महिंद्रा बँक त्याच्या हायपोथकेशन अंतर्गत विक्री करत आहे. गाडी ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीत विक्री करण्यात येईल.

इच्छुक खरेदीदारांनी खालील पत्त्यावर ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने शाखेच्या पत्त्यावर १५ दिवसांच्या आत त्यांचे कोटेशन देऊ शकतात. शाखेचा पत्ता : कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड, न्याती युनिट्री, चौथा मजला, झोन पश्चिम–३, सम्राट अशोक रोड, नगर रोड, गुंजन कार्नर, येरवडा पुणे–४११००६ किंवा

**संपर्क : विनय बेले**
**कोटक महिंद्रा बँक लि.**
**संपर्क/०२२–६७४४३५६० ईमेल : vinay.bele@kotak.com**

## सर्वग्राम फिनकेअर प्रायव्हेट लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** ऑफिस क्र. २२, चौथा मजला, प्राइमरोज मॉल, बाणेर रोड, बाणेर, बाणेर गाव, पुणे, हवेली, महाराष्ट्र, भारत- ४११०४५
**सीआयएन:** U65990PN2018PTC224688
**दूरध्वनी:** 8101777555 **वेबसाइट:** www.sarvagram.com **ईमेल:**cs@sarvagram.com

### सार्वजनिक सूचना

सदर सूचना बृहत् निर्देश- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (बिगर बँकिंग वित्तीय कंपनी- व्याप्तीवर आधारित विनियम) निर्देश २०२३ दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ “आरबीआय निर्देश”) च्या परिच्छेद ४२, संयुक्तरित्या १. सर्वग्राम फिनकेअर प्रायव्हेट लिमिटेड (“कंपनी” किंवा “एसएफपीएल”), या बिगर ठेव स्वीकारणाऱ्या बिगर वित्तीय आर्थिक कंपनी जिचा सीआयएन क्र.: U65990PN2018PTC224688 असून ती नोंदणी क्र. N-13.02342 या नोंदणी प्रमाणपत्राद्वारे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे नोंदणीकृत आहे आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय ऑफिस क्र. २२, चौथा मजला, प्राइमरोज मॉल, बाणेर रोड, बाणेर, बाणेर गाव, पुणे, हवेली, महाराष्ट्र, भारत- 411045 येथे आहे; आणि (ii) सर्वग्राम सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड (“एसएसपीएल”), ही खासगी मर्यादित कंपनी जिची स्थापना कंपनी कायदा 2013 अंतर्गत झाली आहे आणि तिचा सीआयएन क्र.:U74110PN2019PTC224311 असून तिचे नोंदणीकृत कार्यालय ऑफिस क्र. 23 आणि 24, चौथा मजला, प्राइमरोज मॉल, बाणेर रोड, बाणेर, बाणेर गाव, पुणे, हवेली, महाराष्ट्र, भारत 411045 येथे आहे, यांनी प्रस्तावित व्यवहारासंबंधी (खाली स्पष्ट केल्याप्रमाणे) जारी केली आहे.

एसएसपीएल ही कंपनीची विद्यमान समभागधारक असून तिच्याकडे सध्या 1,19,85,504 सक्तीने परिवर्तनीय प्राधान्य समभाग (“सीसीपीएस”) आहेत. एसएसपीएलकडे कंपनीत पूर्णपणे रोखीकृत तत्वावर 79.68% समभाग आहेत. आता कंपनी आणि एसएसपीएल कंपनीत एसएसपीएलने धारण केलेल्या संपूर्ण 1,19,85,504 चे परिवर्तन कंपनीच्या समभागांमध्ये अशा सीसीपीएस (“प्रस्तावित व्यवहार”)चे रूपांतर करण्याचे प्रस्तावित करत आहे. एसएसपीएलने धारण केलेला प्रत्येक सीसीपीएस कंपनीच्या (1) समभागांमध्ये रूपांतरणीय आहे. त्यामुळे प्रस्तावित व्यवहाराच्या अनुषंगाने एसएसपीएल कंपनीतील प्रदान केलेले 79.68% समभाग रूपांतरणीय तत्वावर धारण करतील जे सध्याच्या समभाग धारणांइतकेच आहेत. प्रस्तावित व्यवहारांमुळे कंपनीतील समभाग धारणात बदल होतील आणि त्यामुळे आरबीआय निर्देशांमध्ये नमूद केल्याप्रमाणे कंपनीतील 26% (सव्वीस टक्के) पेक्षा जास्त प्रदान केलेले समभाग भांडवल धारण केले जातील. त्यानुसार कंपनीने प्रस्तावित व्यवहाराशी संबंधित रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (“आरबीआय”) च्या मंजुरीची विनंती केली. आरबीआयने
15 फेब्रुवारी 2024 च्या पत्रान्वये उक्तनिर्देशित सीसीपीएसचे समभागांमध्ये रूपांतरणाच्या अनुषंगाने प्रदान केलेल्या समभाग भांडवलातील बदलाला मंजुरी दिली (“आरबीआय मंजुरी”). उक्तनिर्देशित केल्याप्रमाणे कंपनीतील प्रदान केलेल्या समभाग भांडवलातील बदल प्रस्तुत सूचना प्रकाशित केल्याच्या 30 (तीस) दिवसांनी त्याला प्रशासित करणाऱ्या निश्चिती दस्तऐवजांच्या संदर्भात आणि आरबीआय मंजुरीनुसार दिसून येतील.

या संदर्भातील कोणतेही स्पष्टीकरण आणि / किंवा आक्षेप कंपनीला तिच्या नोंदणीकृत पत्त्यावर प्रस्तुत सूचना प्रकाशित केल्याच्या तारखेपासून 30 (तीस) दिवसांत लेखी स्वरूपात कंपनी सचिव सौ मेघा जैन यांना येथे cs@sarvagram.com ईमेलसह पाठवाव्यात.

प्रस्तुत सूचनेची एक प्रत कंपनीच्या वेबसाइटवरदेखील https://customer.sarvagram.com/compliance-documents/ उपलब्ध आहे.

**दिनांक:** 29.02.2024 **स्थान:** पुणे

**सर्वग्राम फिनकेअर प्रायव्हेट लिमिटेडसाठी**
स्वाक्षरी/-
**नाव: उत्पल इसर**
पदनाम: व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी
DIN: 02780985

**सर्वग्राम सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडसाठी**
स्वाक्षरी/-
**नाव: समीर सत्येंद्रकुमार मिश्रा**
पदनाम: संचालक
DIN: 08291692

**एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड**
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
**नोंदणीकृत कार्यालय:** नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

## तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **‘‘सार्वजनिक ई–लिलावाद्वारे’’ ‘‘जिथे आहे जसे आहे तत्वावर’’** आणि **‘‘ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर’’** खालील मालमत्तेचा ई–लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह–कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 26.02.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. महेश मांझी<br>2. रिना महेश मांझी | मालमत्तेचा पत्ता – फ्लॅट क्रमांक 406, चौथ्या मजल्यावर 33.51 चौ.मी. चटई क्षेत्रफळ, बिल्डिंग क्रमांक B6 मध्ये, एक्झर्बिया हिंजवडी रोड फेज–II म्हणून ओळखले जाते, संलग्न बाल्कनी 2 आणि चौ. 1.76 चौ.मीटर मोजणारी संलग्न बाल्कनी आणि 1.89 चौ.मी.चे पेन टेरेस क्षेत्रफळ, गाव बेबडोहळ, तालुका मावळ, जिल्हा पुणे, महाराष्ट्र भारत 410406 (गॅट क्र. 1 आणि 3) चे आणखी विशेष हक्क. | H16622310720042401/H16622310720042401L/H16622310720042401G | 12 फेब्रुवारी 2024 | रु. 1,94,880/– | रु. 28,01,805.45/– | रु. 19,48,800/– | 30-03-2024 | 05–04–2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30 |

### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई–लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई–लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई–लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **‘‘जशी आहे जिथे आहे तत्वावर’’** आणि **‘‘जशी आहे ज्या स्थितीत आहे’’** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **04/04/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई–लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **05/04/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **06/04/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात, **नाव – शेखर काळे, संपर्क क्रमांक 9823271111, ऑफिस एल&टीफायनान्स होल्डिंग्स लिमिटेड, ऑफिस क्रमांक 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे – 411005. आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटीरोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (04), मुंबई 098.** ई–लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई–लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई–लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई–लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 29.02.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/–
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड


**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✼ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com